महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड , मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल:pmu@mahapocra.gov.in

204

**पत्र क्र.नादेकृसंप्र /प्र.क्र.७९ /प्रापण/** **दिनांक:** ०९.१०.२०२०

प्रती,

---------------------

---------------------

विषय:-नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (PoCRA) च्या **Security Audit** साठी दरपत्रक मागविण्याबाबत.

१. आपणास नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (PoCRA) च्या Security Audit साठी सीलबंद दरपत्रक सादर करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| सेवेचे वर्णन | संख्या | सेवा पुरवण्याचा कालावधी | पुरवठा करावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| Security Audit करणे बाबत.<br>1.FFS(Farmer Fied School) App-<br>Mobile app + backend portal<br>2.SMA(Staff Monitoring App) App-<br>Mobile app + backend portal<br>3.Training App-<br>Mobile app + backend portal<br>4. Team PoCRA-<br>Web Portal<br>5.MahaPoCRA Website-<br>Web Portal<br>6.FIMS(Financial Management system)-<br>Web Portal<br>7.MLP (Micro Planning) App-<br>Mobile app + backend portal<br>8.GIS Dashboard-Web Portal<br>9.PoCRA Soil Survey-Mobile app<br>10.Farmwater Balance –<br>Android App+Mobile app<br>11.DBT (Direct Benefit Transfer)-<br>Web Portal + Mobile app) | ११ | प्रस्तावित सेवांच्या Security Audit प्रमाणपत्र मिळेपर्यंत | नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, ३० अ/ब-अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड , मुंबई ४०० ००५. |

२. शासनास जागतिक बँकेकडून नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पासाठी निधी मंजूर झालेला आहे.सदर निधी मधील काही रक्कम या दरपत्रकाअन्वये करण्यात येणाऱ्या करारनाम्यानुसार करावयाच्या पात्र प्रदानासाठी वापरण्यात येणार आहे .

**३. निविदा किंमत**

अ.करार हा वरील नमूद केलेल्या Security Audit सेवा पुरविण्याबाबत असेल त्यात काही बदल असु शकेल.

ब . सेवेसाठीच्या किंमतीमध्ये सर्व कर व उपकर यांचा समावेश असेल.

क. वस्तू व सेवाकर वेगळा दाखविण्यात यावा.

ड. निविदाकाराने सादर केलेले दर हे करारानाम्यातील कालावधीसाठी स्थिर असतील व त्यात कोणत्याही

कारणामुळे बदल होणार नाही.

इ. दरपत्रकातील दर हे भारतीय रुपयात सादर करावेत.

४.प्रत्येक निविदाकार एकच दरपत्रक सादर करेल . या दरपत्रकाबाबत निविदाकार इतर निविदाकारांशी संपर्क करणार नाही .

**५.दरपत्रकाची वैधता**

दरपत्रक सादर करावयाच्या अंतिम तारखेपासून ३० दिवसापर्यंत दरपत्रक वैध राहील.

**६. दरपत्रकांचे मुल्यमापन**

खरेदीदार खालील बाबींबाबत निविदाकारांनी दिलेल्या प्रतिसादाशी दरपत्रकांची तुलना व मुल्यमापन करेल.

| Sr. No. | Queries | Response from bidder |
|---|---|---|
| 1. | Details of organization<br>(Name, Address, Contact Number) | |
| 2. | Is the organization CERTin/STQC certified or registered with Government of Maharashtra in Security audit GR of 2017? (Yes/No) | |
| 3. | Experience in industry and conducting security audit as per the guidelines of the STQC & Cert-IN (experience in number of years with count of projects in private as well as Government clients) | |
| 4. | Details of past projects (Name of clients) | |
| 5. | Quotation for performing the Security Audit of PoCRA portal/applications | |

अ. दरपत्रके योग्य प्रकारे स्वाक्षरी केलेले आहेत.

ब. दरपत्रकातील अटी, शर्ती व निकषांची पूर्तता करतात.

क. दरपत्रकातील सर्व सेवांची तुलना व मुल्यमापन एकत्रित करण्यात येईल.त्यानंतर सर्वात कमी दर असलेल्या (Least Cost Selection) दरपत्रकाची निवड करण्यात येईल.

ड. वस्तु व सेवाकर दरपत्रकांचे मुल्यमापन करण्यासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.

**७. आदेश**

ज्या निविदाकाराचे दरपत्रक सर्वात जास्त प्रतिसादात्मक (Most Appropriate Bill) असून ज्याचे दर हे सर्वात कमी आहेत त्या निविदाकारास आदेश देण्यात येईल व मंजूरीच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आत सेवा पुरविण्यास सुरुवात केली पाहिजे.

७.१ खरेदीदारास कोणतेही दरपत्रक मान्य करण्याचा वा अमान्य करण्याचा अधिकार व दरपत्रकांची प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करुन सर्व दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार करारनामा करण्याच्या अगोदर राहील.

७.२ ज्या निविदाकाराचे दर मान्य करण्यात आले आहेत त्यास पुरवठा आदेश देण्यात येतील आणि मान्य केलेल्या दराबाबतच्या अटी आदेशामध्ये समाविष्ट करण्यात येतील.

७.३ सदर दरपत्रकास अनुसरून देण्यात येणारा पुरवठा आदेश दिलेल्या तारखेपासून वरील सेवा पूर्ण करून प्रमाणपत्र देण्यापर्यंत ग्राह्य राहील.

८.सेवेचा पुरवठा केल्यानंतर देयकाची अदायगी करण्यात येईल.

९. पुरवठा केलेल्या सेवेसाठी सामान्य व्यावसायिक हमी (Warranty/ Guaranty) लागू राहील.

१०. आपणांस विनंती करण्यात येते की, आपले सीलबंद दरपत्रक **दि. २१.१०.२०२० दुपारी २.०० वाजेपर्यंत** सादर करावेत. प्राप्त दरपत्रके त्याच दिवशी दुपारी ०२.३० वाजता उघडण्यात येतील.

११. आम्हाला आशा आहे की, आपण आपले सीलबंद दरपत्रक सादर कराल तसेच, आपण या प्रकल्पात इच्छा दाखविल्याबाबत धन्यवाद.

**दिनांक :** ९/१०/२०२०.
**ठिकाण :**मुंबई

**नाव:**पी द देशमुख
**हुद्दा:** प्रकल्प उपसंचालक
**पत्ता :** ३०/अ-ब अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर,
कफ परेड , मुंबई-०५.
**दुरध्वनी क्र:** ०२२-२२१६३३५१/५२